# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान
## म.न.पा. नागपूर अंतर्गत
## कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी
## आरोग्य विभाग सिव्हिल लाईन्स,महानगरपालिका नागपूर.

**<u>कंत्राटी पदभरती २०२०-२१</u>**

आरोग्य विभाग महानगरपालिका नागपूर यांचे नियंत्रणाखालील कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी म.न.पा. नागपूर करिता राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम.) अंतर्गत ठराविक एकत्रित मानधनावर करार पध्दतीवर पुर्णतः कंत्राटी स्वरुपात वैद्यकीय अधिकरी यांची पदे रिक्त आहे. रिक्त पदानुसार शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक इच्छूक उमेद्वारांची प्रत्येक महिन्याच्या दुस-या मंगळवारी दुपारी १२:०० वाजता थेट मुलाखत आरोग्य विभाग कार्यालय, पाचवा माळा, प्रशासकीय इमारत, नागपूर महानगरपालिका येथे घेण्यात येईल.

सदर पदे शासन अनुदान उपलब्धतेपर्यंत कंत्राटी स्वरुपात कार्यरत राहतील.

**पदांचा तपशिल.**

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणीक अर्हता | प्रतिमाह मानधन एकत्रित रुपये | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | पुर्ण वेळ वैद्यकिय अधिकारी | एम.बी.बी.एस. व महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलची नोंदणी आवश्यक, अनुभव असल्यास प्राधान्य. | रु.४५०००/- | कमाल वयोमर्यादा ७० वर्ष राहील. |
| २ | अर्ध वेळ वैद्यकिय अधिकारी | एम.बी.बी.एस./एम.डी.(स्त्रीरोग तज्ञ/डी.जी.ओ)/एम.डी.(मेडिसीन)/एम.डी.(बालरोगतज्ञ/डी.सी.एच.) व महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलची नोंदणी आवश्यक, अनुभव असल्यास प्राधान्य. | रु.२८०००/- | कमाल वयोमर्यादा ७० वर्ष राहील. |

## <u>अटी व शर्ती</u>

१) अनुभवाच्याबाबतीत फक्त शासकिय,निम शासकिय,स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत असलेला अनुभव ग्राहय धरण्यात येईल.
२) उमेद्वार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
३) सदरील पदे हि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत निव्वळ कंत्राटी स्वरुपाची राहतील. त्यांचा नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कसलाही संबंध राहणार नाही. पदांसाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.
४) वरील सर्व पदे ही कंत्राटी पध्दतीने भरण्यात येत असल्याने त्यास नागरी सेवा नियम लागू होणार नाही.

५) एकूण पदांच्या संख्येत अथवा आरक्षणामध्ये बदल होवू शकतो.

६) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना प्राप्त परीपत्रक मा. सहसंचालक(तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान दि. १५/०२/२०१६ अन्वये मानधन अदा करण्यात येईल.

७) सदरील पदे ही निव्वळ कंत्राटी पध्द्तीने केवळ प्रकल्प कालावधी पूरते भरावयाचे असून प्रकल्प बंद होताच सदर पदे आपोआप संपुष्टात येतील.

८) मुलाखतीस पात्र उमेद्वाराने मुलाखतीकरीता खालील आवश्यक कागदपत्रे सत्यप्रत(Original) व साक्षांकीत (xerox) प्रतींचा एक संच या सह उपस्थित राहावे.

- नुकताच काढलेला पासपोर्ट साईझ फोटो -१ व स्वतःचा ई-मेल व दुरध्वनी क्रमांक
- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र.
- जन्म तारखेचे प्रमाणपत्र (शाळा/ महाविद्यालय सोडण्याचे प्रमाणपत्र / जन्माचे प्रमाणपत्र)
- ओळखपत्र - आधार कार्ड/ मतदान कार्ड / ड्रायव्हींग लायसंस
- पदाकरीता लागणारी मुळ शैक्षणिक अर्हतेची अंतिम वर्षाची गुणपत्रीका व पदानुसार शासनातर्फे प्राप्त रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.
- पदाकरीता लागणारी मुळ शैक्षणिक अर्हतेशिवाय प्राप्त पदव्युत्तर पदवी (PG Degree) आणि पदव्युत्तर पदवीका (PG Diploma) प्रमाणपत्र.
- वैद्यकीय अधिकाऱ्याकरीता लागु असल्यास सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र.

९) उच्च शैक्षणीक अर्हता धारकांस व अनुभव असलेल्या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल.

१०) कोणत्याही वेळेस भरती अथवा निवड प्रक्रिया रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार निवड समिती एन.यु.एच.एम. म.न.पा. नागपूर यांना राहतील त्यावर कोणतीही हरकत/आक्षेप घेता येणार नाही.

११) आवेदन पत्र स्विकृत / अस्विकृत करण्याचे अधिकार, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करण्याचे तसेच त्याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याबाबतचे संपुर्ण अधिकार अध्यक्ष निवड समिती म.न.पा. नागपूर यांचेकडे राखुन ठेवलेले आहे.

१२) उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

१३) उपस्थित राहणाऱ्या उमेद्वारांना कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

१४) मुलाखतीकरीता उमेदवाराने सर्व आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

१५) निवड झालेल्या उमेदवाराने रुजू होतांना विहीत नमुन्यात रुपये १००/- च्या बॉन्डपेपरवर करारनामा करुन दयावा लागेल. (सेवेदरम्यान करारनाम्याच्या अटी काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील)

१६) ज्या पदाकरीता बिंदू नामावलीनुसार राखीव प्रवर्गास अनुसरुन पदभरती प्रक्रियेव्दारे अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन व राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविण्याचे अभियान आहे ही बाब लक्षात घेऊन ११ महिने कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

**-स्वा-**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सचिव**
**निवड समिती (एन.यु.एच.एम.) महानगर पालिका, नागपूर**